CS (Mains) Exam, 2013



# MARATHI

## PAPER—II

## ( LITERATURE )

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250 |
|---|---|

**QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS**

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in chronological order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : 10×5=50

(a) ''भटोबासां मागां केतुलेया एका काळा अनोबासांचा हरगर्वी भिक्षा केलेयां हे अवघे आइकौनि म्हणितले : सकळां सवीपरीस का कवि चतुर : मग आपणही श्लोकबंध गद्य केले॥''

(b) ''विद्ये विना मति गेली; मती विना नीति गेली; नीती विना गति गेली! गती विना वित्त गेले, वित्ता विना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.''

(c) ''त्याचे प्रेम जडू नये अशीच माझी इच्छा आहे. माझ्यासारखी डाग लागलेली स्त्री त्यांची बायको व्हावयास नको.''

(d) ''कां मारी दैव कुठार! कीं उरिं खोल गेली वा तरवार!!
अवचित कुठूनि असा बसला! घाव जिव्हारीं?
तगमग होई! तगमग होई। जाळित काय। सर्वांगास विखार।''

(e) ''तू मला नकार द्यायचा हट्ट चालवलास तर मी मग फारच कडवट बनेन. स्त्रीद्वेष्टा, क्यण्ट्यकरस थेरडा, ब्रह्मचारी बनेन.''

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

(a) 'स्मृतिस्थळ'च्या आधारे तत्कालीन परिस्थितींचा परिचय करून देणाऱ्या संदर्भांची चिकित्सात्मक माहिती द्या. 15

(b) प्रस्थापित वर्गव्यवस्थेविषयीचा रोष व्यक्त करताना जोतीराव गोविंदराव फुले यांनी त्यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड'मध्ये कोणते सकारात्मक मार्ग सुचविले आहेत? 15

(c) 'साष्टांग नमस्कार' या नाट्यकृतीद्वारे आचार्य प्रह्लाद केशव अत्रे यांनी प्रयोगशीलता आणि व्यावसायिकता यांचा संगम करून दाखविला, ह्या विधानाचा साधार परामर्ष घ्या. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

(a) 'ब्राह्मणकन्या' ही कादंबरी वस्तुस्थितीचे चित्रण करीत असताना कचरत नाही, असे म्हणता येईल काय? याविषयीचा साधार परामर्ष घ्या. 15

(b) 'जेव्हा मी जात चोरली होती' ह्या कथासंग्रहातील स्त्री-व्यक्तिरेखेसमोर मृत्यूची मान नम्र होते असे म्हणता येते का, हे संदर्भांसह सिद्ध करा. 15

(c) प्रह्लाद ईरबाजी सोनकांबळे यांच्या आत्मकथनाद्वारे संयमाचे आणि चिंतनाचे भान ठेवणारी 'आठवणींचे पक्षी' ही साहित्यकृती निर्माण झाली असे खचितपणे म्हणता येते का, याविषयीची साधकबाधक चर्चा करा. 20

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

*(a)* 'जन हे वोळतु जेथे' ह्या कादंबरीत शरच्चन्द्र मुक्तिबोध यांना भारतीय तत्त्वज्ञान, मनाचे नियंत्रण शिकवते; तर मार्क्सचं तत्त्वज्ञान, जगावर नियंत्रण करून वर्गविरहित समान समाजाचा पुरस्कार करते व ते तसे करणे परस्परविरोधी नाही, असे मांडण्यात यश लाभले आहे काय, ह्याविषयीचा ऊहापोह करा. 20

*(b)* 'कारावासातून पत्रे', 'मध्य लटपटीत' आणि 'एकेक पान गळावया' अशा तीन कादंबरिका मिळून लिहिली गेलेल्या गौरी देशपांडे यांच्या साहित्यकृतीत व्यक्तिरेखांचे अस्तित्व रोखठोकपणे जाणवत असते, असे तुम्हाला वाटत असल्यास त्यासंबंधीची संदर्भांसह चिकित्सात्मक माहिती द्या. 15

*(c)* 'शिळान अधिक आठ कथा'मध्ये उद्धव ज० शेळके यांच्या लेखनातील जीवनानुभव साहित्यांतर्गत वास्तव संयमित स्वरूपाचे आहे असे तुम्हाला वाटते का? ह्या प्रश्नाच्या संदर्भात साधार उकल करा. 15

## SECTION—B

**5.** पुढील पाच पद्यखण्डांची प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : 10×5=50

*(a)* नवमास गर्भवासी। कष्ट जाले त्या मातेसी।
ते निष्ठुर जाली कैसी। अंती दूर राहिली।

*(b)* गजबज बंह् जाली माय धांवोनि आली। धरुनि हृदयदेशीं तीजला सेज केली॥
करिति विजणवारे त्या सख्या वेगळाल्या। वडिलवडिल दाया जाणत्याही मिळाल्या॥

*(c)* मदनाची मंगलमाया। नटनाच करी हृदयांत;
स्फुरतात कल्पनातीत। रणकार सुखाचे त्यांत.
किति होत नाच नयनांचा। किति रंग मुखावर आलेच
ते चित्त चोर चित्ताला। कितिदां तरि चुकवुनि गेले.

*(d)* काळाच्या कवि, वालुकेवरि तुवा जी रोवली पावले
नाही दर्शविण्यास शक्त पथ ती कोणा नसो तो तरी
आहे आग जगातली जरि नसे संगीत स्वर्गातले
तत्त्वांचा बडिवारही न अथवा ना गूढशी माधुरी.

*(e)* "अरे, कविता-बिविता लिहितोस की काय?
छान, छान,
मलासुद्धा गटे आवडायचा."

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

*(a)* नामदेवांनी कृष्णकथेच्या मानाने रामकथेचा विस्तार अल्प प्रमाणातच केला आहे, ह्या विधानाचा साधार परामर्ष घ्या. 15

*(b)* रघुनाथपंडित-विरचित 'दमयंतीस्वयंवर' या काव्याची वर्णनशैली ही संस्कृतनिष्ठ आहे, ह्या विधानाशी संबंधित साधार साधकबाधक चर्चा करा. 15

*(c)* म० ना० अदवंत यांनी संपादित केलेल्या 'पैजण' संग्रहातील काव्याविष्काराचे मराठी साहित्येतिहासातील महत्त्व अधोरेखित करा. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

*(a)* बालकवींच्या कवितेचे, काव्यानुभवाचे विश्वच वेगळे होते. त्यांनी जसा कुणाचा संप्रदाय स्वीकारला नाही, तसाच त्यांचा संप्रदायही कोणाला आत्मसात करता आला नाही, ह्या विधानाचे औचित्य साधार तपासा. 20

*(b)* 'समिधाच सख्या या' ह्या कवितेद्वारा कुसुमाग्रजांच्या 'विशाखा'तील कवितांची स्वाभाविक प्रकृती निश्चित होते काय, ह्या प्रश्नाच्या आधारे सन्दर्भासह स्पष्टीकरण द्या. 15

*(c)* 'जाहीरनामा'तील कविता म्हणजे व्यक्तिगत सुखदुःखाचे कढ, उमाळे रुंदावून ते समष्टीशी युक्त होताना विश्वात्मकता साधणारी भावात्मकता होय, हे मत कितपत सयुक्तिक वाटते ते सन्दर्भासह स्पष्ट करा. 15

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *250* शब्दांत लिहा :

*(a)* माणिक गोडघाटे 'ग्रेस' यांच्या 'संध्याकाळच्या कवितां'तील 'स्मरणशिल्प' या चौथ्या काव्यगुच्छात 'इन्ग्रिड बर्गमन्' या शीर्षकाची एक कविता म्हणजे ग्रेस यांनी सर्जनशील पूर्वसुरींशी साधलेला संवाद आहे, ह्या विधानाची यथार्थता साधार अधोरेखित करा. 20

*(b)* नामदेव ढसाळांच्या 'या सत्तेत जीव रमत नाही' मध्ये वाचकाला कवीच्या नकारात्मक भूमिकेचा प्रत्यय येतो असे म्हणता येते का? याविषयीची संदर्भासह चर्चा करा. 15

*(c)* विंदांच्या 'मृद्गंध' कवितासंग्रहात गद्याच्या परखडपणासोबत निखालस शारीर अनुभवांतील रसरशीत सत्याला सुरूप देणाऱ्या भावाविष्काराचा प्रत्यय येतो अशा मताविषयीचे उदाहरणांसह विवरण करा. 15

★ ★ ★

CS (Main) Exam : ,2014

# MARATHI

## Paper—II

## (Literature)

*Time Allowed : Three Hours*

*Maximum Marks : 250*

**QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS**

**Please read each of the following instructions carefully before attempting questions :**

There are **EIGHT** questions divided in **Two Sections**.

Candidate has to attempt **FIVE** questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, **THREE** are to be attempted choosing at least **ONE** question from each section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in **MARATHI**.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in chronological order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the answer book must be clearly struck off.

---

## SECTION—A

Q.1. **पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी 150 शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा :—** **10×5=50**

Q. 1(a) "आपण मनाई हुकूम तोडला म्हणून तो आता भडकून गुराढोरासारखा आपल्याला बडविणार आणि घरी गेल्यावर सासू जळत्या कोलीताने समाचार घेणार, उपाशी ठेवणार, या कल्पनेने तिला मागे फिरण्याची इच्छा होऊ लागली. परंतु तिला मागे फिरता येत नव्हते. मागे फिरले तरीही मार पडणारच होता." 10

Q. 1(b) "मी मानेनं नकार दर्शवितो. क्षणात हाकेच्या अंतरावर गेलेला असतो. पण माय मात्र जागच्याजागीच खिळून असते. तिनं उजव्या हातात लुगड्याचा पदर उंचावून धरला असतो. कधी कधी तो डोळ्यांना भिडला असतो." 10

Q. 1(c) "आयुष्य तुझं आहे. त्यातले निर्णय तू घ्यायचेस. मी तुझा निषेधही करत नाहिये आणि वाहवाही. पण निदान तू स्वत:ची प्रतारणा करू नकोस." 10

Q. 1(d) "मला वाटलं आता वाटेतच चेलमा है व पाणी बी काळं भोर दिसतंय व उतीम लोक कोणी बी दिसत नाही तर पिऊन घ्यावं पाणी व चालतं व्हावं. पुढे बऱ्याच अंतरावर पाणी होतं. पण तितक्या लांब जाण्यापेक्षा इथंच प्यावं पाणी असं वाटू लागलं." 10

Q. 1(e) "तव रंभाइसें काइ नेणों : कवणेंसी कटकट करीत होतीं : तें भटोबासीं आइकीलें आणि म्हणितलें : हां वो रंभाइ : तूं अखंड कटकट करीतसि : तूं जाये : म्हणौनि दवडीली : सिवीया दीधलीया : यैसे कोपले : मग तियें विजना गेली : विजन केलें : माघौति वेळेंसि आली : भटोबासी दंडवत केलें :" 10

Q. 2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

Q. 2(a) 'स्मृतिस्थळ'च्या भाषाशैलीची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा. 15

Q. 2(b) महात्मा जोतिबा फुले यांनी ज्ञानाची, विद्येची महती समाजमनावर कशी बिंबवली, त्याचे विश्लेषण करा. 15

Q. 2(c) 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीतून प्रकट होणाऱ्या आधुनिकतेचे स्वरूप उलगडून दाखवा. 20

Q. 3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

Q. 3(a) " 'साष्टांग नमस्कार' या नाटकाने मराठी विनोदाला बहुमुखी आणि बहुरंगी बनविले आहे'' या विधानाची चर्चा करा. 20

Q. 3(b) 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीत मार्क्सवादाचा प्रभाव कितपत जाणवतो त्याची चिकित्सा करा. 15

Q. 3(c) विदर्भातील निम्नस्तरीय जीवनात चालू असलेला दारुण संग्राम उद्धव शेळके यांच्या कथांमधून कसा प्रकट झालेला आहे, ते सोदाहरण सांगा. 15

Q. 4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

Q. 4(a) बाबूराव बागूल यांच्या कथालेखनात प्रकट झालेल्या अन्यायाविरुद्धच्या आक्रमकतेचे स्वरूप स्पष्ट करा. 15

Q. 4(b) स्त्री-पुरुष संबंधातील ताण हे 'एकेक पान गळावया' चे मध्यवर्ती आशयसूत्र आहे काय ?—चर्चा करा. 20

Q. 4(c) 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाच्या आधारे प्र. ई. सोनकांबळे यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष वर्णन करा. 15

## SECTION—B

**Q.5. पुढील पाच पद्यखंडांचे प्रत्येकी 150 शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा :— 10×5=50**

Q. 5(a) "भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली
हे हात माझे सर्वस्व, दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले'' 10

Q. 5(b) "वा तांडव करिता सोम प्राशुनी काली
रक्तात नाहली शिरमुंडावळ भाली
थयथया नाचता नरड्यांवर प्रेतांच्या
हे कंकण निखळुनि पडले भूवर खाली'' 10

Q. 5(c) "नको मोजू माझ्या
मुक्तीची अंतरे;
ब्रह्मांडाची दारे
बंद झाली.'' 10

Q. 5(d) "दिवसेंदिवस माण्सं अशी छोटी छोटी होत जातायत
चुका आपण करतो
दोष सैतानाला देतो'' 10

Q. 5(e) "मुखी नाम हाती टाळी। दया नुपजे कोणे काळी।।
काय करावे ते गाणे। धिक् धिक् ते लाजिर वाणे।।
हरिदास म्हणोनी हालवी मान। कवडीसाठी घेतो प्राण।।
हरिदासाचे पायी लोळे। केशी धरोनी कापी गळे।।" 10

Q. 6. **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—**

Q. 6(a) ज्ञानदेवांच्या कार्याचे वर्णन नामदेवांनी कसे केले आहे, आणि त्यातून त्यांच्या ज्ञानदेवांविषयीच्या भावना कशा व्यक्त होतात, ते सांगा. 15

Q. 6(b) संतांच्या आणि पंडितांच्या कवितेपेक्षा शाहिरी काव्य अगदी वेगळ्या प्रकारचे कसे होते, त्याचे विवेचन 'पैंजण' मधील कवितांच्या आधारे करा. 20

Q. 6(c) 'दमयंतीस्वयंवर' या काव्यातील प्रसंगनिर्मितीचे कौशल्य वर्णन करा. 15

Q. 7. **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—**

Q. 7(a) बालकवींनी निसर्गातील विविध घटकांना मानवी भावना कशा प्रदान केल्या आहेत, ते सोदाहरण वर्णन करा. 15

Q. 7(b) केशवसुतांच्या सामाजिक आशयाच्या कवितांचा वारसा कुसुमाग्रज यांनी पुढे चालविला असे म्हणता येईल का, ते 'विशाखा' मधील कवितांच्या आधारे ठरवा. 20

Q. 7(c) दाहक प्रेमवंचनेचा खोल कडवट अनुभव करंदीकरांच्या प्रेमकवितेत कसा व्यक्त होतो, ते 'मृद्‌गंध' मधील कवितांच्या आधारे सांगा. 15

Q. 8. **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—**

Q. 8(a) 'जाहीरनामा' या कवितासंग्रहातील कवितांमधून प्रकट झालेले दु:ख आणि दारिद्र्य यांचे स्वरूप वर्णन करा. 15

Q. 8(b) ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' मधील प्रतिमासृष्टीचे वेगळेपण स्पष्ट करा. 20

Q. 8(c) 'या सत्तेत जीव रमत नाही' या संग्रहातील कवितांचे आकृतिबंध विविध पातळ्यांची सरमिसळ करून कसे बनलेले आहेत, ते विशद करा. 15

CS (Main) Exam

# MARATHI

## PAPER—II

## ( LITERATURE )

CS (Main) Exam

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

### QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : 10×5=50

*(a)* पंडिता : आतां पुसों नको : आतां अति सम्येक वर्तत असे : आतां तुम्हां पांचास्यां गुरुकुळातें हात जोडूनि म्हणत असें : गोसावियांचा व्यापार चालवितां कोण्हा माझें वेकास गेलें असैल : तरि तुम्हीं समस्तीं क्षेमा करावी :

*(b)* यावरून निर्मीकानें मानवप्राण्यांस जी कांहीं अत्युत्तम **सारासार विचार करण्याची बुद्धि** दिली आहे, तिजपासून त्याला एकंदर सर्व कामीं दिवसानुदिवस ज्यास्ती सुधारणा करितां येईल.

*(c)* स्त्रीनें अविवाहित असतां मातृत्व पत्करलें तर तें वस्तुतः पाप नाहीं. तें पाप समजलें जातें याचें कारण त्याचा परिणाम इष्ट होत नाहीं हें होय. स्त्री लग्नाशिवाय पुरुषापाशी राहिली तर त्या स्त्रीला पुरुषाच्या इस्टेटीवर अधिकार उत्पन्न होत नाहीं; व त्या स्त्रीपासून उत्पन्न होणाऱ्या प्रजेस बापाच्या इस्टेटीवर हक्क उत्पन्न होत नाहीं; म्हणून विवाहाशिवाय प्रजोत्पत्ति निषेदिली गेली आहे.

*(d)* ''तुमचा शत्रू तुम्हांला स्वच्छ दिसतो, समोर दिसतो. आमचे शत्रू बाहेर कुणीच नसतात... आमच्या प्रिय व्यक्ती याच आम्हांला शत्रुवत वाटतात...त्यांच्यावर चवताळणं, क्रूर वाग्बाणांनी त्यांना घायाळ करणं, हेच आमचे पराक्रम... आणि गळणाऱ्या रक्ताकडं पाहून पश्चात्तापानं तडफडणं, जळत राहणं, हीच आमची दिनचर्या !''

*(e)* मला नेहमी वाटतं की शिकार म्हणून जर गेलो नसतो तर पुढचा पेचप्रसंग आला नसता. पण म्हणतात ना होणारी ती काही केल्या टळणारे नसते व जे जे व्हईल ते ते माणसाने बघितले पाहिजे, त्याला टाळता येत नाही. मला नेहमी वाटत आलेलं आहे की, शिकार करायला गेलो नि शिकार होऊन आलो.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'स्मृतिस्थळ' या ग्रंथाची ठळक वैशिष्ट्ये सांगून त्यातील स्मृतींद्वारे तत्कालीन राजकीय-सामाजिक इत्यादी विषयांशी संबंधित असलेला जीवनाचा पट आपल्यासमोर कशा प्रकारे उलगडला जातो, ते साधार सांगा. 15

*(b)* ''म फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकात तत्कालीन शेतकऱ्यांच्या अवनतस्थितीचे चित्र रेखाटून त्या स्थितीची मूलगामी मीमांसा केली आहे.'' या संदर्भात साधार चर्चा करा. 15

*(c)* विविध प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, नैतिक चर्चांच्या संदर्भात दिलेल्या अवतरणांमुळे 'ब्राह्मणकन्या' ही कादंबरी वेगळी उठून दिसत असली तरीही ती त्याचमुळे कादंबरीच्या रूपबंधापासून मात्र दूर जाते, असे तुम्हाला वाटते का याविषयीची साधार चर्चा करा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'साष्टांग नमस्कार' ही नाट्यकृती विनोदाच्या विविध रूपांचा आविष्कार कशा प्रकारे करते, ते सोदाहरण अधोरेखित करा. 15

*(b)* ''उद्धव शेळके यांचा 'शिळान' ह्या पहिल्या कथासंग्रहातील वैदर्भीय ग्रामीण जीवनाच्या सूक्ष्म चित्रणामुळे व बोलीच्या वापरामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरला.'' या विधानाची यथार्थता तपासा. 15

*(c)* ''बागुलांच्या कथा कथावाङ्मय प्रकाराशी संबंधित असलेल्या लोकप्रिय कल्पना उधळून लावणाऱ्या आहेत .... त्यांचे बळ त्यांच्यातून सळसळणाऱ्या चैतन्यात सामावलेले असते.'' ह्या विधानाच्या आधार 'जेव्हा मी जात चोरली होती' या संग्रहाच्या संदर्भात चर्चा करा. 20

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीत व्यक्तीचे समष्टीशी एकरूप होणे वेगवेगळ्या प्रकारे आविष्कृत झाले आहे—या मताची साधार चिकित्सा करा. 15

*(b)* 'एकेक पान गळावया' या संग्रहातील लघुकादंबऱ्यांच्याद्वारे लेखिकेला आविष्कृत करता आलेल्या अनुभवांचे आणि जीवनदृष्टीचे वेगळेपण अधोरेखित करा. 15

*(c)* 'आठवणींचे पक्षी' हे मराठीमधील एक प्रभावी व यशस्वी आत्मकथन ठरण्याची कारणे कोणती आहेत, असे तुम्हाला वाटते ह्या विषयाशी संबंधित सकारण चर्चा करा. 20

## SECTION—B

**5.** पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : 10×5=50

*(a)* मंदाकिनीमधिल जी कनकारविंदें।
तीं जेवितों मृदुलनालमृणालकंदें।
आम्ही असों नृपसुते तरि कांचनाचे।
जें कार्य तें धरिल कीं गुण कारणाचे॥

*(b)* दो दिवसांची तनु ही साची सुरतरसाची करूनि मजा।
गमजा करितां मनिं उमजाना हें सुख न पुढें पडेल वजा॥ भाइ सावध व्हा॥

*(c)* सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे;
बंधहि होतीं शिथिल, हरपतें भनहि जगताचें.
जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं;
हाय ! सुटेना दृढ देहाची परि बसली गांठी !

*(d)* ध्येय, प्रेम, आशा यांची
होतसे का कधी पूर्ती
वेड्यापरी पूजतो या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ती !

*(e)* जात, वर्ण, धर्माचे नद्या-डोंगर ओलांडून ज्ञानोबा तुम्हाला
अमृतानुभवाकडे जाता आले नाही
ताटी लावून जसे पहिल्यांदा रुसून बसलात ते रुसणे
कायमच राहिले.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* अभ्यासक्रमात अंतर्भूत केलेल्या नामदेवांच्या अभंगवाणीच्या आधारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणकोणते विशेष कशा प्रकारे प्रकट झाले आहेत, ते सोदाहरण स्पष्ट करा. 15

*(b)* 'पैंजण' मधील लावण्यांमधून कवींच्या सौंदर्यदृष्टीची वैशिष्ट्ये कशा प्रकारे आविष्कृत झाली आहेत ह्या विषयाची समीक्षा करा. 15

*(c)* पंडिती काव्याची कोणकोणती वैशिष्ट्ये रघुनाथपंडितांच्या 'दमयंतीस्वयंवरा' मध्ये पाहावयास मिळतात, ते साधार सांगा. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* बालकवींच्या कवितेत रोमँटिसिझममधील कोणकोणत्या वृत्तिविशेषांचा कशा प्रकारे आविष्कार झाला आहे, ते साधार लिहा. 15

*(b)* 'विशाखा' तील कवितांद्वारे आविष्कृत झालेल्या कवीच्या सामाजिक व राष्ट्रीय जाणिवांची विस्ताराने चर्चा करा. 15

*(c)* विंदा करंदीकर यांच्या 'मृद्गंध' या संग्रहामध्ये विविध अनुभवांचा व जाणिवांचा प्रभावी आविष्कार झाला आहे. विधानाची चिकित्सा करा. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* नारायण सुर्वे यांच्या 'जाहीरनामा' संग्रहामधील कवितेचे वेगळेपण वैयक्तिकता तसेच वर्गरेषा यांत सामावले आहे अशी भूमिका घेऊन विस्ताराने चर्चा करा. 15

*(b)* "ग्रेस यांची कविता केवळ त्यांच्या आंतरिक वास्तवातूनच आकार धारण करते, तिचा समकालीन वास्तवाशी कोणताही संबंध नाही." या विधानाची साधार चिकित्सा करा. 15

*(c)* 'या सत्तेत जीव रमत नाही' या संग्रहामध्ये कवीचा भर समूहलक्ष्यी जाणिवांपेक्षा अस्तित्वलक्ष्यी जाणिवांवर अधिक आहे, हे मत तुम्हाला पटते का? या प्रश्नाशी संबंधित सकारण उत्तर लिहा. 20

★ ★ ★

CS (MAIN) Exam:2016

**M–ESC–D–MRT**

# MARATHI (PAPER—II)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

---

# मराठी (प्रश्न-पत्र–II)

( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी तीन प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान एक तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहावयाचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतेली एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

## SECTION—A

**1.** पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* आपणा सर्वांच्या निर्मिकाने एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न करतेवेळी मनुष्यास जन्मतः स्वतंत्र प्राणी निर्माण केला आहे आणि त्यास आपआपसात सारखे हक्काचा उपभोग घेण्यास समर्थ केला आहे. आणि याच कारणास्तव प्रत्येक मनुष्य गावातील व मुलखातील अधिकारांच्या जागा चालविण्याचा अधिकारी आहे.

*(b)* एकु दिसु भटोबासांसि पंडितः केशोबासिं संस्कृतभाषां प्रश्न केलाः त्यावरि भटोबासीं म्हणितलेः 'पंडितां केशवदेयाः तुमचा 'अस्मात्-कस्मात्' मी नेणें गाः मज श्री चक्रधरें निरुपिलीं मऱ्हाटीः तियाचि पुसाः'.

*(c)* मला वाटायला लागले की महात्मा फुलेनी मानव जातीला न उचलण्या-येवढे उपकार करून ठेवलेत पण त्याच वंशाचा माळी माणूस इकडे अज्ञानाच्या गर्तेत गुरफटलेला आहे. म्हणजे कुठेही जा मग माणसात असो की निसर्गात तिथे तुमची जात येणारच. माळी, बामण व सगळे एका धरतीची लेकरे आज वर आहोत उद्या तिच्याखाली (उदरात) जाणार आहोत व तेथे कोण-कोठे याचा पत्ताही लागणार नाही. परंतु हे सगळे नखरे वर असेपर्यंतच.

*(d)* समाजाच्या कर्तृत्त्वविकासात दोन्ही तऱ्हेच्या कुटुंबपद्धति अवश्य आहेत. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत स्त्री व पुरुष यांची श्रमविभागणी होऊन स्त्रीस केवळ गृहकर्मेच करावी लागतात. जेव्हां स्त्रीस द्रव्यार्जनदेखील करावे लागते तेव्हा तीस कायद्याने जरी कौटुंबिक सत्ता दिली नसली तरी ती उत्पन्न होतेच. यासाठी स्त्रीसत्ता चोरट्या द्वाराने येऊ न देता उघड्या द्वाराने येऊ द्या. त्या सत्तेचे विचारपूर्वक संरक्षण संवर्धन पाहिजे.

*(e)* आता काळहि बदलला, कायदेहि बदलले, सगळयाच गोष्टी बदलल्या ! आणि आम्हीं देखील कालपरिस्थितीच्या मानाने आमची मतेंहि बदललीच ! न बदलून काय चालतं आहे?

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'स्मृतिस्थळ' या ग्रंथाचे ऐतिहासिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन महत्त्व सोदाहरण स्पष्ट करा. 15

*(b)* "नाटककार अत्रे यांनी मराठी रंगभूमीला जीवनदान दिले, आपल्या विनोदी व गंभीर नाटकांनी ती जिवंत ठेवली." या विधानाचा परामर्श घ्या. 15

*(c)* 'बाबुराव बागुलांचे कथाविश्व त्यांच्या जीवनदृष्टीतून, त्यांच्या तत्त्वचिंतनातून व अनुभवलेल्या जगण्यातून साकार झाले आहे'. 'जेव्हां मी जात चोरली होती' च्या आधारे चर्चा करा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* ग्रामीण स्त्रियांच्या संघर्षमय जीवनाचे यथार्थ चित्रण उद्धव शेळके यांनी 'शिळान' कथा संग्रहात कसे केले आहे, याचे सविस्तर विवेचन करा. 15

*(b)* 'जन हे वोळतु जेथे' कादंबरीचा मध्यवर्ती आशय उलगडून दाखवा. 15

*(c)* 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीत नैतिकदृष्ट्या स्खलनशील स्त्री-पुरुष संबंधांचा विचार केला आहे. साधार चर्चा करा. 20

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांची मध्यवर्ती कल्पना स्त्री-पुरुष नातेसंबंधांभोवतीच फिरते.'' या विधानाची 'एकेक पान गळावया'च्या आधारे चिकित्सा करा. 15

(b) 'गतायुष्यात भोगलेली दुःखे, यातना, अस्पृष्यतेचे चटके आणि दारिद्र्याची भीषणता 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनात प्र.ई. सोनकांबळे यांनी मांडली आहे.' सविस्तर परामर्श घ्या. 15

(c) 'शेतकऱ्याचा असूड' आणि 'सार्वजनिक सत्यधर्म' मधील विचारांमुळे समाज परिवर्तन प्रक्रियेला वेगळे परिमाण कसे लाभले ते सविस्तर लिहा. 20

## SECTION—B

5. पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) या शहरावर, संस्कृतीवर, फुलांवर कसा उरावा विश्वास
भडाभडा चार तांबे ओतून मोकळे होऊ नये, तर काय करावे?
म्हणालोच, ही पृथ्वीः हिला केवळ जन्माला घालणेच ठाऊक आहे.
आपणच आपणाला सदैव सदा घालू नये, तर काय करावे?

(b) गजबज बहु जाली माय धांवोनि आली।
धरुनि हृदयेशी तिजला सेज केली॥
करिति विजणवारे त्या सख्या वेगळाल्या।
वडिलवडिल दाया जाणत्याही मिळाल्या॥

(c) रंगांच्या रसनेत सूर्य बुडला अंधारले सागरी
बेटांचे जळबिंब फक्त हलते माझ्याच प्राणावरी
घोड्यांचे पथ दक्षिणेत मिटले गेले सखेसोबती
एकाकी नभ प्राक्तनात शिरता रक्तात येते भिती.

(d) कशास आई भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल
सरणावरती आज आमुची पेटतात प्रेते
उठतिल त्या ज्वालातुन भावी क्रांतीचे नेते
लोहदंड तव पायांमधले खळाखळा तुटणार

(e) जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी।
झड घालुन प्राण देतो दीपकाचे वरी।
हे मी सांगत असतांना कांगे पडले भरी।
रत्न टाकून पदरांत गार घेऊ नकोरे॥

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'बालकवी निसर्गाकडे एक पूर्ण रूप, एक आनंदाचे रूप म्हणून पाहतात. त्यांच्या दृष्टीने निसर्गाचे जग हे निर्मत्सर, निरागस आहे.' या विधानाची सत्यता पटवून द्या. 15

(b) '''जाहीरनामा' म्हणजे विसाव्या शतकातील माणसांना उद्देशून कवीने केलेले आवाहन आहे.'' या विधानाची चिकित्सा करा. 15

(c) ''स्वातंत्र्याबद्दलची कमालीची आसक्ती, याबरोबरच अन्याय, जुलूम, विषमता यांच्या विरुद्धचा आक्रोश हा 'विशाखा' या संग्रहाचा मुख्य आशयप्रदेश आहे.'' या विधानाचा परामर्श घ्या. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* नामदेवांच्या अंतरंगाचे अत्यंत स्वच्छ व नितळ प्रतिबिंब त्यांच्या अभंगवाणीतून कसे प्रकट झाले आहे, ते विचार करा. 15

*(b)* ''शाहिरी कवितेच्या प्रेरणा स्वतंत्र असल्याने त्यांचा आविष्कारही स्वतंत्र आहे.'' साधार चर्चा करा. 15

*(c)* ''काव्यगुणांच्या दृष्टीने दमयंतीस्वयंवर हे प्राचीन मराठीतील सर्वश्रेष्ठ मानले पाहिजे.'' विवेचन करा. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* ''मृदगंध या कविता संग्रहात करंदीकरांची सामाजिक जाणीव आणि इहवादी दृष्टिकोन ठाशीवपणे व्यक्त होतो.'' चर्चा करा. 15

*(b)* ''भारतीय संस्कृतीतील संचित आणि पाश्चात्य वाङ्मयाचे संस्कार यांमुळे ग्रेस यांची कविता अनोख्या संवेदनविश्वातून फिरत असल्याचे जाणवत राहते.'' या विधानाचा परामर्श घ्या. 15

*(c)* ''ढसाळांच्या कवितेत समूहनिष्ठेबरोबरच वैयक्तिक भावजीवन व्यक्त करणारा आत्मनिष्ठ सूरही व्यक्त होतो.'' 'या सत्तेत जीव रमत नाही'च्या आधारे स्पष्ट करा. 20

★★★

# CS (MAIN) Exam : 2017

**STH-D-MRTH**

## मराठी / MARATHI

## प्रश्न-पत्र II / Paper II

## साहित्य / Literature

*वेळ : तीन तास*
*Time Allowed : **Three** Hours*

*कमाल अंक : **250***
*Maximum Marks : **250***

---

### प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

***उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात :***

*आठ प्रश्नांची विभागणी **दोन भागां**मध्ये केलेली आहे.*

*उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.*

*प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*

*प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.*

***मराठीतच** उत्तरे लिहावीत.*

*ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.*

*प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतेली एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.*

### Question Paper Specific Instructions

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*There are **EIGHT** questions divided in **TWO SECTIONS.***

*Candidate has to attempt **FIVE** questions in all.*

*Questions no. **1** and **5** are compulsory and out of the remaining, any **THREE** are to be attempted choosing at least **ONE** question from each section.*

*The number of marks carried by a question / part is indicated against it.*

*Answers must be written in **MARATHI.***

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to.*

*Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.*

---

## SECTION A

**Q1.** **पुढील *पाच* उताऱ्यांचे 150 शब्दांत संदर्भासह सटीक विवेचन करा.** ***10×5=50***

(a) "स्त्रियांची जात फार अबला असल्यामुळे लोभी व धाडसी पुरुषांनी मोठी कावेबाजी करून कोणत्याही कामामध्ये स्त्रीजातीची संमती घेतल्याशिवाय एकंदर सर्व पुरुषांनी आपलेच घोडे पुढें दामटले. त्यांस मानवी हक्क समजू देऊ नये, या इराद्याने त्यांस विद्या शिकविण्यास प्रतिबंध केला. यामुळे एकंदर सर्व स्त्रियांवर अशा तऱ्हेचा जुलमी प्रसंग येऊन गुदरला." *10*

(b) " 'रत्नमाळा'चि पोथी वाचूनि केशोबासिं भटोबासाते पुसिले : हा भटो यैसेचि 'उद्धरण' बांधो : तंव भटोबासिं म्हणितले : नको गा केशवदेया : येणे माझिया म्हांतारीया नागवतिल : मग केशोबास संस्कृतबंधु न करीतीचि :" *10*

(c) "स्त्री ने अविवाहित असतां मातृत्त्व पत्करले तें वस्तुत: पाप नाहीं. तें पाप समजले जातें याचें कारण त्याचा परिणाम इष्ट होत नाही, हें होय. स्त्री लग्नाशिवाय पुरुषापाशीं राहिली तर त्या स्त्रीला पुरुषाच्या इस्टेटीवर अधिकार उत्पन्न होत नाही; व त्या स्त्रीपासून उत्पन्न होणाऱ्या प्रजेस बापाच्या इस्टेटीवर हक्क उत्पन्न होत नाही; म्हणून विवाहाशिवाय प्रजोत्पत्ति निषेधिली गेली आहे." *10*

(d) "रंगी हतबुद्ध झाली. तिला हुंदका आवरला नाही. ती काहीशा कळवळयानं पुन्हा त्या मुलाला विनवू लागली. पण सारं व्यर्थ. तो जागचा हलायला तयारच होईना. तिला एकाएकी बा ची आठवण झाली. आपण त्याला एकटं सोडून आल्याचं तिला जाणवले. त्याच काही बरंवाईट तरी नाही ना झालं ?" *10*

(e) "सगळ्या मर्यादा धडाधड झुगारून द्यायच्या हेच तेवढं मॉडर्न. चार लोकात छाप पाडण्यासारखं ज्ञान दाखवणं हे स्मार्ट. जाड्या जाड्या पुस्तकात डोकं खूपसून बसून 'डोंट बॉदर मी नाऊ' असं म्हणणे म्हणजे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जोपासना. टाईपरायटरवर चार पानं खरडून कुठं छापून आणणं ही विद्वत्ता. मुकाट पोटासाठी उद्योग करणारी, कुणाच्या अध्यात मध्यात न पडणारी, इंटरनॅशनल पॉलिटिक्सचं स्पेलिंगसुद्धा करता न येणारी माणसं तुमच्या लेखी निर्बुद्ध ओंडके. असू देत मग. मी त्यांच्यातलीच आहे." *10*

**Q2.** (a) ‘स्मृतिस्थळ म्हणजे महानुभावांचा आचारधर्म आणि तत्त्वज्ञान यांचा वाङ्मयीन आकृतिबंध होय’ या विधानाचा परामर्श घ्या. *15*

(b) भारतीय जातिव्यवस्थेच्या संदर्भात एक वेगळी समाजशास्त्रीय जाण व्यक्त करणारी कादंबरी म्हणून केतकरांच्या ‘ब्राम्हणकन्या’ या कादंबरीचे स्वरूप उलगडून दाखवा. *15*

(c) ‘शेतकऱ्यांच्या अवनतस्थितीची अनेक कारणे प्रामुख्याने धर्म आणि राज्य या संस्थेशी निगडित आहेत’ हा महात्मा फुले यांचा विचार ‘शेतकऱ्यांचा असूड’ मधून कसा व्यक्त झालेला आहे, ते स्पष्ट करा. *20*

**Q3.** (a) ‘शिळान’च्या आधारे उद्धव शेळके यांच्या लेखनशैलीचे विशेष स्पष्ट करा. *15*

(b) ऱ्हासशील मराठी रंगभूमीला सावरून धरणारे लोकप्रिय विनोदी नाटक म्हणून अत्रे यांच्या ‘साष्टांग नमस्कार’ या नाटकाचे समीक्षण करा. *15*

(c) ‘दलित जीवनातील वेदनेबरोबरच विद्रोहाचा प्रखर स्वर हे बाबुराव बागुल यांच्या कथांचे मुख्य वैशिष्ट्य आहे’ हे ‘जेव्हा मी जात चोरली होती’ या कथासंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा. *20*

**Q4.** (a) ‘गौरी देशपांडे यांच्या लघुकादंबऱ्या स्त्री-पुरुष संबंधाचे व्यक्तिवादी दृष्टीतून चित्रण करणाऱ्या आहेत’ ‘एकेक पान गळावया’च्या आधारे स्पष्ट करा. *15*

(b) एका दलिताच्या असहाय, दुःखी जीवनाचे चित्रण करणारी आत्मकथा म्हणून ‘आठवणींचे पक्षी’ या आत्मकथेची वैशिष्ट्ये सांगा. *15*

(c) समकालीन मराठी कादंबरीपेक्षा शरत्चंद्र मुक्तिबोध यांच्या ‘जन हे वोळतु जेथे’ या कादंबरीचे वेगळेपण काय, ते सांगा. *20*

## SECTION B

**Q5.** **पुढील *पाच* उताऱ्यांचे 150 शब्दांत रसग्रहणात्मक सटीक विवेचन करा.** *10×5=50*

(a) अंबरगत परी पयोधराते रगडुनि पळतो दुरी
काय हा धीट म्हणावा तरी
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया हरी
नव्हे गे मारूत मेघोदरी ।। *10*

(b) ती शीतलोपचारी जागी झाली हळूच मग बोले
'औषध नलगे मजला'; परिसुनि जननी बरे म्हणोनि डोले. *10*

(c) खुळा दधिची फसला देऊन
अपुली हाडे असुरवधास्तव,
त्या वज्राने तेव्हापासून
मानव आहे कापित मानव *10*

(d) ज्यांना जन्मभर दु:ख, दैन्य, दारिद्र्यच मिळाले असेल
त्यांनी तपशीलासह सर्वच नाकारू नये, तर काय करावे ?
आश्वासित शब्दांवर आता माझाही विश्वास उरलेला नाही
प्रत्येक संदर्भातून दुर्गंधीच येत आहे; तर काय करावे ? *10*

(e) भक्त विठोबाचे भोळे । त्यांचे पायी ज्ञान लोळे
भक्ति विण शब्दज्ञान । व्यर्थ अवघे ते जाण
नाही ज्याचे चित्ती भक्ति । जळो तयाची व्युत्पत्ति
नामा म्हणे ऐसे जाण । नाही भक्तिसी बंधन *10*

**Q6.** (a) भक्ति आणि लोकोपदेश या आशयावरील संत नामदेवांच्या अभंगांचा 'नामदेवांची अभंगवाणी'च्या आधारे परामर्श घ्या. *15*

(b) पंडिती काव्यातील एक सर्वोत्तम रचना म्हणून 'दमयंति-स्वयंवर' या काव्याचे सौंदर्य उलगडून दाखवा. *15*

(c) 'पैंजण'च्या आधारे लावणी वाङ्मयाची साधार वैशिष्ट्ये लिहा. *20*

**Q7.** (a) 'प्रफुल्ल निसर्गाची आनंदगीते गाणारे बालकवि मनाची उदासीन स्थितिही तेवढ्याच प्रभावीपणे व्यक्त करतात.' सोदाहरण स्पष्ट करा. *15*

(b) 'मृद्गंध' मधील प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या कवितांचा परामर्श घ्या. *15*

(c) 'आजच्या समाजरचनेच्या अंतरंगाचे भेदक चित्रण करणारे कवि कुसुमाग्रज आशावादाचे स्फुल्लिंग चेतवणारे ही आहेत.' विशाखा'च्या आधारे स्पष्ट करा. *20*

**Q8.** (a) 'कवितेत मी माझ्याशीच संवाद करतो' या नारायण सुर्वे यांच्या विधानाच्या आधारे 'जाहीरनामा' मधील कवितांचे अंतरंग उलगडून दाखवा. *15*

(b) शब्दकला, प्रतिमा आणि रचनाबंध यांच्या आधारे 'संध्याकाळच्या कविता' मधील ग्रेस यांच्या कवितेचे सौंदर्य उलगडून दाखवा. *15*

(c) 'ढसाळ यांच्या कवितेतील विद्रोहाचा तीव्र स्वर' या 'सत्तेत जीव रमत नाही' या 'संग्रहात अधिक अंतर्मुख आणि अस्तित्त्वलक्ष्यी झालेला आहे.' विवेचन करा. *20*

**EGT–D–MRTH**

# मराठी (प्रश्न-पत्र–II)

## ( साहित्य )

| वेळ : तीन तास | कमाल अंक : 250 |
|---|---|

### प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नाच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तराती काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

# MARATHI (PAPER—II)

## ( LITERATURE )

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250 |
|---|---|

### QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादकपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* ...सरकारी गोरे अधिकारी हे बहुतेक करून ऐषआरामात गुंग असल्यामुळें त्यांना शेतकऱ्यांचे वास्तविक स्थितीबद्दल माहिती करून घेण्यापुरती सवड होत नाही व या त्यांच्या गाफीलपणानें एकंदर सर्व सरकारी खात्यांत ब्राम्हण कामगारांचे प्राबल्य असतें, या दोन्ही कारणांमुळे शेतकरी लोक इतके लुटले जातात की, त्यांस पोटभर भाकर व अंगभर वस्त्रही मिळत नाही...

*(b)* एक वेळ भटोबासांसी तृषा लागली : तें एकाते म्हणीतलें : मज पाणी पाजा गा : तंवं तेहीं थिल्लरीचे उदक गाळुनी आणीलें : आणि भटोबासांसी संपादीले : ते भट पीयाले : भग म्हणीतलें : भटो तुम्हां बोडिगंगा समान सांधितीली असें कीं : भटोबासी म्हणीतलें : ते आपणयांसी समान होआवी : पुढीलासी संपादीतां बोडि ले बोडि : आणि गंगा ते गंगा : ऐसी बुधि हुआवी की : तथा भावेंहीन तें दैवंहीन म्हणणें.

*(c)* स्त्रीने विवाहपद्धतीचा व पुरुषांकिततेचा स्वीकार करून आपल्या पोषणाची आणि आपल्या अपत्यांच्या पोषणाची जबाबदारी पुरुषावर ढकलावी ही गोष्ट बहुजनसाध्य असल्यामुळे या रीतीचाच अवलंब जगभर झाला. आणि ही संस्था यशस्वी करण्यासाठी पातिव्रत्याचे महत्त्व सर्व कवी वर्णू लागले व पुरुषाचा अधिकार पक्का होण्यासाठी कायदे होऊ लागले.

*(d)* मी बी.ए. परीक्षेत पांच वेळा नापास झालो! कां झालो याचे कारण ठाऊक आहे? आमचे स्टार्सच असे भिकार की, प्रत्येकवेळी परीक्षेत नेमका असा नंबर यायचा की, त्याच्या आकड्यांची बेरीज हटकून नऊ व्हायची. पहिल्या परीक्षेस सुरुवात नऊ तारखेला होती, तर शेवटल्या खेपेला परीक्षेचा निकाला नऊ तार खेला होता.

*(e)* आम्ही दोघेही तसच त्या भाकरी व जी असेल ती भाजी खातासू. येवढं मात्र खरं की धर्माला चोरून त्याला चांगली भाकर ठेवून कचकच लागणारी मी खाऊन टाकायचो कारण मला वाटायचं की धर्मा हा गुरुमायीचा पोरगा व आपण एक परदिसा व ह्या धर्माच्या नावानं येवढं तरी मिळतं तेही काही न करता मग किती चांगल है हे सगळं वाटायचं.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचे चित्र 'स्मृतिस्थळा'तून कसे साकार झाले आहे, त्यासंदर्भातील मत साधार स्पष्ट करा. 15

*(b)* महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये त्या काळातल्या शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीचे वर्णन केले आहे. या विधानाचा परामर्श घ्या. 15

*(c)* 'आठवणींचे पक्षी' मधील जीवनानुभव सामान्यपासून तत्त्वशोधन करणाऱ्यांपर्यंत सर्वांना अन्तर्मुख करणारे आहेत, हा देखलि ह्या छोट्या ग्रंथातील एक महत्त्वचा विशेष होय, या विधानाची साधार चर्चा करा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'एकेक पान गळावया' या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना स्त्री-पुरुष नातेसंबंधांभोवतीच फिरते. साधार स्पष्ट करा. 15

*(b)* शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी 'जिशू' च्या माध्यमा द्वारे सामर्थ्यशाली प्रवृत्ती असलेल्या एका व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा आलेख रेखाटला आहे, या विधानाच्या संदर्भात साधार उहापोह करा. 15

*(c)* बाबूराव बागूल हे दलित जीवनाचे प्रभावी भाष्यकार होते, या विधानाची 'जेव्हा मी जात चोरली होती' या संग्रहाच्या आधारे चिकित्सा करा. 20

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''मानवी प्रेरणा, पुरुषसत्ताक समाजव्यवस्था आणि स्त्रीचे निवडस्वातंत्र्य याविषयीची ठाम भूमिका केतकरांच्या 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीत गृहीत धरलेली दिसते.'' साधार स्पष्ट करा. 15

(b) 'साष्टांग नमस्कार' या नाट्यकृती द्वारे आचार्य अत्रे यांनी मानवी स्वभावातील विसंगतीचे दर्शन कसे घडविले आहे. साधार स्पष्ट करा. 15

(c) उद्धव शेळके यांच्या लेखनातील जीवनानुभव मर्यादित स्वरूपाचे आहेत असे तुम्हाला वाटते का? 'शिळान' कथासंग्रहाच्या आधारे चर्चा करा. 20

## SECTION—B

5. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादकपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a)
सुंदरा मनामधि भरलि जरा नाहि ठरली
हवेलिंत शिरली मोत्याचा भांग।
रे गड्या हौस नाहिं पुरलि म्हणोनी विरली
पुन्हा नाहिं फिरलि कुणाची सांग॥

(b)
प्रकट तिजपुढारी जाहला राजमौळी
पदर बरि न घेतां हार तैसा झळाळी
निजहृदयनिवासी काय बाहेरि आला
निरखुनि दमयंती तेंवि मानी तयाला

(c)
परी भव्य ते तेज पाहून पूजून
घेऊ गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे!

(d)
जाड परोठ्यान झालो म्हणा षंढ
आता कैवे बंड इहलोकी...
अनंताचे म्हणा फळो आले ज्ञान
परी रोटीवीण व्यर्थ बाप्पा
संपलाच नाही भाकरीचा मार्ग
ग्रंथातले स्वर्ग कशापायी?

(e)
नको मोजू माझ्या मुक्तीची अंतरे,
ब्रह्मांडाची दारे बंद झाली
माझ्या आसवांना फुटे हिमगंध,
मागे पुढे बंध पापण्यांचे

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''अंतर्मुखता, आत्मपरता आणि जिव्हाळा हा नामदेवांच्या कवितेचा गाभा आहे.'' चर्चा करा. 15

(b) 'दमयंती-स्वयंवर' या काव्याच्या आधारे रघुनाथपंडितांच्या काव्यगुणां विष्काराचा परामर्श घ्या. 15

(c) शाहिरी वाङ्मयाला 'मराठी काव्याची प्रभात' असे कोणी म्हटले ते सांगून पैंजण या संग्रहाच्या आधारे अशा संशोधनाच्या सार्थकतेविषयीची चर्चा करा. 20

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'एक निसर्गकवी' म्हणून बालकवींच्या काव्याविष्काराविषयीचा परामर्श घ्या. 15

(b) 'संध्याकाळच्या कविता' या संग्रहाच्या आधारे ग्रेस यांच्या प्रतिमासृष्टीवर बेतलेले सार्थक टिपण लिहा. 15

(c) ''स्वातंत्र्याबद्दलची कमालीची आसक्ती, पारतंत्र्याबद्दलचा कमालीचा संताप याबरोबरच अन्याय, जुलुम, विषमता यांच्याविरुद्धचा आक्रोश हा 'विशाखा' या संग्रहाचा मुख्य आशयप्रदेश आहे.'' या विधानाची सत्यता पटवून द्या. 20

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) '' 'जाहीरनामा संग्रहातील' कविता श्रमिकांच्या जीवनानुभवांचे विविध पदर उलगडून दाखवते.'' साधार चर्चा करा. 15

(b) ''सामाजिकतेच्या पलिकडे जाऊन मानवी अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न नामदेव ढसाळ यांची कविता करते.'' 'या सत्तेत जीव रमत नाही'च्या आधारे हे विधान स्पष्ट करा. 15

(c) 'मृदगंध' मधील प्रतिमासृष्टीची वैशिष्ट्ये अधोरेखित करा. 20

* * *

# मराठी (प्रश्न-पत्र–II)

( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

### उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

# MARATHI (PAPER—II)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

### Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादकपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) या उपरि मागौतें कामाइसीं म्हणितलें: 'भटो रावो मरैलः आणि मातें आगीआंतु घालीतीलः' भटोबासीं म्हणितलें: 'तरि तुम्ही आपुला आदि भावो चुकवा.' 'मग ते बळाधिकारें घालीतीलः' 'तरि तुम्हां आत्महत्येचें नरक नाहींः' इतुलेनि ते उगीचि राहिलीः मग कांहीं पदार्थ आणिला होताः तो भटोबासांसि संपादिलाः मग आज्ञा घेउनि गावां गेलीं:॥ मग कितीका दिसां रावो निवर्तलाः मग तेहीं तैसेंचि केलें: बहुतापरि उवापुला आदिभावो चुकवीला.

(b) ''तर मग बरोबर! आम्ही तरी त्यांना संतच समजत होतो.''
विश्वासनं चपापून त्याच्याकडं पाहिलं. चर्या तर सद्भावयुक्त दिसत होती!
''कोणाला?'' संदर्भ विसरून विश्वासनं विचारलं.
''तुमच्या वडिलांना हो! मौज अशी की, तेसुद्धा दुःखातच मेले!''
सदाशिवरावांनी किंचित हसून उत्तर दिलं.
''त्यात मौज कोणती दिसली तुम्हांला?'' कासावीस होत विश्वासनं विचारलं.

(c) पुढं शेवंतीकडून बोलवत नसे. खांद्यावर डोळे कोरडवण्याखेरीज ती काहीच करत नसे. हे बघून कवेतल्या अनंताला काय वाटे, तोच जाणे! मायकडे पाहता पाहता एक दिलखुलास उसळी मारून तो हसू लागे. शेवंती त्याच्याशी बोले, ''काऽय हासतं बेलमा! माया जिवाची काई फिकर आये तुले? उद्या मेली मंजे दिसते ना देव! थांब जरा; मंग हासजो-काय हासतं तं! जातं कुठीसा?''
हेच पण थोड्याफार फरकानं आजही झालं.

(d) नाल मारण्यासाठी फास टाकून बैल जसा उलथा करतात, तसा दामूच्या उद्गारानं गाव उलथा झाला. करीमचाचातील प्रामाणिक माणूस कंठ फोडून ओरडला—''ए कभी होगा नहीं, मैं ऐसा सत्यानास होनेकू दुंगा नहीं.'' त्यासाठी दामूला दुणता करण्यासाठी जगन्नाथ वेताळ होऊन उठला. त्याच्या डोळ्यात वीज चमकून गेली, त्याची भुवई सळसळून दुभंग झाली, दात करकरले, खालच्या ओठाने अंग ताणले, हंटर गरगरत कडे ओलांडून दामूकडे येऊ लागला-लक्ष्या पुजारी रागानं मारुतीचे पाय ओरबाडू लागला.

(e) जसजसा मोठा होत चाललो तसतसा शाळा नसली म्हणजे लोकायसंग गुड खुडायला व नंतर नंतर पिवळा कापायला जायला लागलो. गुड खुडणे एकदाचे सोपे पण पिवळा कापणे जरा कठीण. कारण जरा धाट धांडाळ फिडाळ असलं तर कधी कधी धाट न कापून विळा हातावर किंवा पायावर येयाचा. विळ्याने व धांडाळ धाटाच्या चिवटीने हाता पायाचे बोटं अनेक वेळा कापून रक्त नसतानाही बाहेर आल्यामुळे खूप आग झाल्याचे व चिघळू नये म्हणून जखमजोडीचा पाला लावल्याचे आठवते.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'महात्मा फुले यांनी ब्राह्मण्य मानसिकतेच्या वर्णवर्चस्वाविरुद्ध जो ऐतिहासिक संघर्ष केला' त्याची 'सार्वजनिक सामधर्म' या ग्रंथाच्या माध्यमातून ओळख करुन द्या. 15

(b) 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीच्या कथानक रचनेचे वैशिष्ट्ये सोदाहरण नोंदवा. 15

(c) प्र० के० अत्रे यांच्या 'साष्टांग नमस्कार' मधून दिसणाऱ्या विनोदी शैलीचे वेगळेपण नोंदवा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'स्त्रीला सातत्याने दुय्यम स्थानी ठेवण्यामागे प्रस्थापित पुरुषप्रधान व्यवस्थेची मनोभूमिका कारणीभूत आहे' या विधानाची 'एकेक पान गळावया' या गौरी देशपांडे लिखित कादंबरीच्या आधारे चिकित्सा करा. 15

(b) 'शिळान' या कथासंग्रहातील संवादांच्या वेगळेपणाची सोदाहरण मांडणी करा. 15

(c) 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनामध्ये प्र. ई. सोनकांबळे यांनी आपल्या बहिणीचे जे व्यक्तिचित्रण केलेले आहे, त्यातील वैशिष्ट्यांचा धांडोळा घ्या. 20

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) "आचार्य अत्र्यांची नाटके हा मराठी रंगभूमीच्या आणि विनोदी साहित्याच्या विकासातला महत्त्वाचा टप्पा आहे." साधार स्पष्ट करा. 15

(b) 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीमध्ये शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी केलेले विविध प्रसंगांचे चित्रण कसे प्रभावी ठरते? त्याविषयी चर्चा करा. 15

(c) जातिप्रथेला सुरूंग लावणाऱ्या बाबूराव बागूल यांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथेतील वास्तवतेची दाहकता स्पष्ट करा. 20

## SECTION—B

**5.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादकपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) "टाकी उपानह पदें अति मंद ठेवी।
केली विजार वरि डौरहि मौन सेवी॥
हस्तीं करी वलय उंच अशा उपायीं।
भूपें हळूच धरिला कलहंस पायीं॥"

(b) "ब्रह्मांडाची सदाफूली। अक्षयते मध्ये फुलली
फुले तिची बघता नयनी। वेड भरुनि अंतःकरणी
फूलपाखरे परोपरी। निर्वेधपणे फुलांवरी
जशी स्वये तरलित होती। मंद तरल गंधावरती
तेवि जगाच्या फुलांवरी। गंध दाटले परोपरी
अनुभवुनी हर्षित व्हावे। सुखदुःखे चुंबित गावे"

(c) "अंधाराचा काळा हत्ती
पृथ्वीपुढे झुलतो आहे
पायांखाली काय दडे?
नरबलीचे प्रेत सडे;
तुझी-माझी धाव आहे
दातापासून दाताकडे."

(d) "आणि दोस्तहो!
मी पाहतो आहे
एक क्षुब्ध नवागत गतीचे टोक धरून
लिहितो आहे;
हे शब्द हटवा... हे पुतळे... स्थितिस्थापक.
हवा आहे मनासारखा नवा जाहिरनामा म्हणून.
नवा जाहिरनामा म्हणून."

*(e)* ''हा एक हृदय-कापणीचा हंगाम
समाप्तीच्या अगोदरची ही ऑक्टोबरची हीट
मऊशार लुसलुशीत काळोखात अश्रुचं चकाकणं
नियतीच्या आसाभोवती फिरणारा घोडा
मी ठोकून बसलोय मांड त्यावर
चल मेरे घोडे टिक् टिक् टिक्
मला हे सारंच ढकलायला हवं पुढं...''

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* ''शाहिरांच्या लावण्या वाचू लागलो म्हणजे पेशवेकाळाच्या अखेर अखेर आढळणाऱ्या रंगेलपणाचे, सुखविलासी वृत्तीचे, बेफिकीरपणाचे दर्शन आपणांला अधिक होते.'' या विधानाचे ऐतिहासिक व वाङ्मयीन साधर्म्य, वैधर्म्य नोंदवा. 15

*(b)* बालकवींना 'सृष्टीचा गायक' हे अभिधान कसे समर्पक ठरते ते त्यांच्या कविता ओळींच्या संदर्भाने स्पष्ट करा. 15

*(c)* 'दमयंती स्वयंवर' या काव्यातील अलंकारयोजनेची विविधता सोदाहरण स्पष्ट करा. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'विशाखा' या काव्यसंग्रहाच्या आधारे कुसुमाग्रजांच्या प्रतिभासामर्थ्याचे महत्त्व विशद करा. 15

*(b)* 'या सत्तेत जीव रमत नाही' या काव्यसंग्रहात नामदेव ढसाळ यांच्या काव्यानुभवाचा विकास सामाजिकतेकडून आध्यात्मिकतेच्या दिशेने झालेला आहे काय? या विषयी साधक बाधक चर्चा करा. 15

*(c)* 'मृद्‌गंध' या कवितासंग्रहातून विंदा करंदीकर यांच्या समाजनिरीक्षणातील विविधता कशी प्रत्ययास येते, ते सोदाहरण सांगा. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'संध्याकाळच्या कविता' या काव्यसंग्रहात ग्रेस यांनी विविध वृत्तांचा आणि मुक्तछंदाचा वापर करून आपले रचनाकौशल्यावरील प्रभुत्व कसे प्रदर्शित केले आहे, त्याची सोदाहरण चिकित्सा करा. 15

*(b)* नामदेवांच्या काव्यजाणिवेतील भावनिष्ठतेचे सोदाहरण विवेचन करा. 15

*(c)* 'जाहिरनामा' या काव्यसंग्रहाच्या आधारे, नारायण सुर्वे यांनी नाट्यगीत या काव्यप्रकाराला नवे परिमाण कसे दिले, त्याची चर्चा करा. 20

★ ★ ★

CS (Main) Exam, 2020

**URC–B–MRTH**

# मराठी (प्रश्न-पत्र–II)

## ( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

### प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

# MARATHI (PAPER—II)

## ( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

### QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* ''यावरून एकंदर सर्व धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांनी नमून सार्वजनिक सत्यास साष्टांग प्रणिपात करावा अथवा सार्वजनिक सत्याने एकंदर सर्व धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांस कोणत्या तऱ्हेने मान द्यावा? या विषयी तुमचा तुम्हीच सरळ चोख विचार करून पहा.''

*(b)* ''एकवेळ बोरीकरां भानुभटा भटोबासाचे दर्शन जालेः कवणिपरी जाले ते नेणिजेः भटोबासांपासौनी श्रवण जालेः भीक्षा केलीः भटोबासां थोर पढीयेंतिः तयांचे आधील गुरू तयां नावं केसवाचार्येः मग प्रकरणानुरूप भटोबासी भानुभटाचे नाव 'कविस्वर' ठेविलेः तैसेचि प्रकरणानुरूप 'भटो' ऐसे म्हणतिः.''

*(c)* ''तुमच्या कुटुंबाचे जे भवितव्य ठरले आहे ते ओळखण्याचे तुम्ही गर्वाने नाकारीत आहात आणि जितके दिवस ते तुम्ही नाकाराल तितके दिवस तुम्हाला स्थैर्य उत्पन्न होणार नाही. ज्या समाजात तुम्ही शिरू इच्छिता तो समाज तुम्हास कधीच घेणार नाही; आणि तो समाज तुम्हांस स्वीकारावयास तयार आहे त्या समाजास तुम्ही स्वतःपेक्षा कमी समजून वगळीत आहात.''

*(d)* ''नेव्हर माइंड, झालं ते गेलं, तू या प्रकारचा निघालास तरी तुझं ठीकच चाललंय की ! आईबापांना क्षमा करायला शीक अधूनमधून. म्हातारपणी येणार नाही तुझ्याकडे कटकट करायला. हयाचे थोडे मार्क दे !''

*(e)* ''आमचे शत्रु बाहेर कुणीच नसतात ... आमच्या प्रिय व्यक्ती याच आम्हांला शत्रुवत वाटतात ... त्यांच्यावर चवताळणं, क्रूर वाग्बाणांनी त्यांना घायाळ करणं, हेच आमचे पराक्रम .... आणि गळणाऱ्या रक्ताकडं पाहून पश्चातापानं तडफडणं, जळत राहाणं, हीच आमची दिनचर्या !''

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* सामाजिक व वाङ्मयीन इतिहासाच्या दृष्टीने 'स्मृतिस्थळ' या ग्रंथाचे महत्त्व विशद करा. 15

*(b)* शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीचे चित्र रेखाटून त्यांच्या स्थितीची मूलगामी मीमांसा म. फुले यांनी कशातऱ्हेने केली आहे, ते सांगा. 15

*(c)* 'कथानकाच्या आधारे आणि पात्रचित्रणाद्वारे डॉ० केतकर यांनी समाज प्रबोधनाचे कार्य यशस्वीपणे केले आहे' या मताची 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीच्या आधारे सत्यता पटवा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* प्र. के. अत्रे यांनी मराठी नाटकाला कोणकोणत्या बाबतीत नवे वळण लावले, ते 'साष्टांग नमस्कार' च्या आधारे लिहा. 15

*(b)* 'बाबुराव बागूलांची कथा समाजाची दुःखे नष्ट करण्याच्या तळमळीतून विद्रोही झाली आहे' या विधानाची साधार चर्चा करा. 15

*(c)* सार्वत्रिक स्वरूपाच्या मानवी भावभावनांचे प्रत्ययकारी चित्रण हे 'शिळान' या कथासंग्रहाचे वेगळेपण होय, कसे ते सांगा. 20

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) प्र. ई. सोनकांबळे यांनी सोसलेल्या व्यथा-वेदनांचे चित्रण 'आठवणींचे पक्षी' मधून अत्यंत प्रभावीपणे प्रकट झाले आहे . कसे ते सांगा. 15

(b) 'जन हे वोळुतु जेथे' ही कादंबरी म्हणजे व्यक्ती आणि काळ यांच्या परस्पर संबंधांचा वास्तववादी वेध हे विधान तुम्हांस पटते काय? विवेचन करा. 15

(c) 'स्त्री-पुरूष नात्यांमधले सूक्ष्म आणि हळवे पदर हळूवारपणे उलगडून दाखवण्यात गौरी देशपांडे यांचे कौशल्य अपूर्व आहे' हे विधान 'एकेक पान गळावया' च्या आधारे स्पष्ट करा. 20

**SECTION—B**

5. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) "मूलि उपवर हे जाहसी इयेला
पाहिजे की वर योग्य पाहिजेला
अशा ऐकोनि वधूचिया बोला
सैंवराचा मग यत्न नृपें केला."

(b) "पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा।
महाल मोकासे जहरी वळसे करितील अपुला बंदा।
सुईदोऱ्याला हयात असों द्या तोचि इनाम मोकासा।
निजकर्मी रत नर झाल्यावर काय उणा मग त्या पैसा।"

(c) "ध्येय, प्रेम, आशा यांची
होतसे का कधी पूर्ती
वेडयापरी पूजतो या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ती."

(d) "पहाड ईथले मुके दिवस आंधळा की जसा
अभंग तिमिरांतला तडत चालला आरसा
तसा सहज नाचतों कधि न बांधिली पैंजणे
जशा धुळिंतल्या दिशा भुलुन गाय जी हंबरे..."

(e) "कृपेची साउली अखंड लाधली। खेचर माउली भेटलीया
आतां मज भय नाही पै कोणाचे। जन्ममरणाचे दुःख गेले
बंधमोक्षाची फिटली काळजी। समाधि लागली समाधीसी
नामा म्हणे माझें सर्वही साधन। खेचरचरण न विसंबे."

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* नामदेवांची भक्तिभावना त्यांच्या भावकवितेतून एका भाविक भक्ताच्या भूमिकेतून आविष्कृत होते—कशी ते सोदाहरण स्पष्ट करा. 15

*(b)* 'दमयंती-स्वयंवर' या आख्यानकाव्यात रम्य स्थलवर्णने व मुग्ध शृंगारवर्णने यांच्यामुळे सौंदर्य आले आहे, स्पष्ट करा. 15

*(c)* शाहिरी कवितेने सामान्य व्यक्तींच्या लौकिक जीवनाचा प्रभावी आविष्कार कसा केला आहे, ते सोदाहरण पटवून द्या. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'निसर्गाकडे व त्यातील सौंदर्याकडे पाहण्याची विशिष्ट दृष्टी हा बालकवींचा मराठी कवितेला प्रेमाचा आहेर आहे' या विधानाची यथार्थता पटवा. 15

*(b)* 'सायंकालीन गूढ भावार्त मनःस्थितीचे प्रकटीकरण कवी ग्रेस यांच्या कवितांतून उत्कटपणे जाणवत रहाते' सोदाहरण स्पष्ट करा. 15

*(c)* कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेचे स्वरूप तुम्ही अभ्यासलेल्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* मढेकरांनंतर नारायण सुर्वे यांनी मराठी कवितेला जिवंत आणि वास्तवाभिमुख बनविले 'जाहीरनामा' या काव्यसंग्रहाच्या आधारे विशद करा. 15

*(b)* जाणिवेच्या विविध स्तरांवरचे भावानुभव करंदीकर यांच्या 'मृदगंध' या काव्यसंग्रहातून समर्थपणे कसे व्यक्त झालेले दिसतात? ते लिहा. 15

*(c)* नामदेव ढसाळांची कविता एका विशिष्ट समाजाचेच नव्हे तर संपूर्ण शोषित आणि पीडित समाजाच्या वेदनांचे चित्रण करते 'हे विधान या सत्तेत जीव रमत नाही' च्या आधारे स्पष्ट करा. 20

★ ★ ★

CS (Main) Exam,2021



# मराठी (प्रश्न-पत्र–II)

## ( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

### प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

# MARATHI (PAPER—II)

## ( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

### QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* महदाइसी म्हणितले सृष्टीमध्ये देवो दुर्लभः कां देवाते आठवी तो दुर्लभु : ॥ : शोधु : ॥ : मग तयाते खालि ठेऊनि भिक्षा मागितली : ॥ :

*(b)* अरे, मी या अभागी दुष्टाने माझ्यावरील अरिष्ट टाळण्याकरितां माझ्या सगुणाचा गळा कापून तिच्या नांदण्याचे चांदणे केले! आता मी हल्ली सालचा शेतसारा द्यावा तरी कोठून?

*(c)* काव्य खावे काव्य पावे। काव्य घ्यावे सारखे।
काव्य गावे काव्य घ्यावे। बडबडावे अन् मुखे।
काव्य ल्यावे नखशिखी अन्। काव्य घ्यावे मस्तकी।
काव्य छातीवरी धरोनी। अन् मरावे शेवटी।

*(d)* क्रांतीचे विद्यापीठ असलेल्या नगरीचा मी श्रमशूर नागरिक आहे. माझे हात भारताच्या प्रगतीचे रथ आहेत. मी नव्या सार्वत्रिक सुखाचा शिल्पकार, मानवतेसाठी लढणारा, मरणारा झुंजार...

*(e)* परंतु मी जसजसा मोठा होऊ लागलो तसतसं मला कळायला लागलं की तिच्यावर दाजी व आत्याचा धाक आहे म्हणून ती मला बोलतीया. नसता कशाला बोलली असती बिचारी.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'स्मृतिस्थळ' या ग्रंथाची वैशिष्ट्ये लिहून महानुभाव संप्रदायातील त्याचे महत्त्व विशद करा. 15

*(b)* ''मानवी प्रवृत्तींचे भडक विडंबन 'साष्टांग नमस्कार' मध्ये कसे केले आहे'' या मताची चर्चा करा. 15

*(c)* 'शिळान' च्या आधारे उधव शेळके यांच्या अनुभवविश्वाचे सामर्थ्य काय आहे आणि हे अनुभवविश्व सीमित आहे का याची चर्चा करा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'गरिबी आणि पोरकेपणामुळे सहन कराव्या लागलेल्या सोनकांबळे यांच्या आठवणी म्हणजे साक्षात निखारे आहेत' या मताची चर्चा करा. 15

*(b)* शेतकऱ्यांच्या परिस्थितीत कोणती सुधारणा व्हावी असे महात्मा फुले यांना वाटते ते 'शेतकऱ्याचा आसूड' च्या आधारे लिहा. 15

*(c)* माझी भूमिका शिक्षकाची आहे ही केतकरांची भूमिका 'ब्राह्मणकन्या' मधून कशी व्यक्त होते ते लिहा. 20

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'जन हे वोळतू जेथे' मधील नायकाच्या भोवतालचे विश्व आणि त्याची संवेदनशीलता यांतील संघर्ष चित्रित करा. 15

*(b)* भारतीय समाजव्यवस्थेतील जाती-जाती मधील संघर्ष व तेढ बाबुराव बागुलांच्या कथेतून कशी अभिव्यक्त झाली ते लिहा. 15

*(c)* गौरी देशपांडे यांच्या 'एकेक पान गळावया' या कादंबरीत समाजातील स्त्रीचे शोषण कसे दाखवले आहे ते लिहा. 20

## SECTION—B

**5.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* हे मंद-मंद पद सुंदर कुंद-दंती
चाले जसा मद-धुरंधर इंद्र दंती
हंसा धरु जवळि जाय कृशोदरी ते
निष्कंप-कंकण-करासि पुढे करीते.

*(b)* रण काय भयानक लोळे आग जळत!
आदळती, वळती, आवळती क्रोधात
जणुं जिंकायासी गगनाचे स्वामित्व
आजाद-घनांशी झुंजे वादळ-वात!

*(c)* भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली
हे हात माझे सर्वस्व, दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले.

*(d)* कुणीकडे हा झुकतो वारा!
हांका मारी जीव कुणाला!
मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला.

*(e)* कधी याचितों सन्; कधी स्वप्न याची,
कधी धांवतो काळ टाकून मागें.
कधी वर्णतों अमृताच्या सरी अन्
कधी मृत्युची भाबडी भीक मागें.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* जगणे कठीण असल्याचा आक्रोश आणि नरकतुल्य जीवनात बेचैन झालेल्या मनाची व्यथा नारायण सुर्व्यांच्या कवितेत कशी उमटली आहे याचे विवेचन करा. 15

*(b)* निसर्ग आणि औदासिन्य हे बालकवींच्या अनुभवविश्वाचे महत्त्वाचे घटक त्यांच्या कवितेत कसे प्रत्यंतरास येतात ते स्पष्ट करा. 15

*(c)* 'विठ्ठलमाऊलीचे ठिकाणी नितांत प्रेमभावना हाच भागवतधर्म, हाच भक्तीमार्ग आणि हेच वारकरी पंथाचे रहस्य होय.' या विधानाची सार्थता संत नामदेवांच्या अभंगांच्या आधारे पटवून द्या. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* वातावरणनिर्मिती, शब्दसमृद्धी, नाट्यमयता ही रघुनाथ पंडितांच्या कलाविलासाची लक्षणे 'दमयंती स्वयंवराच्या' आधारे स्पष्ट करा. 15

*(b)* 'विशाखाने एक पिढी घडवली इतके ओज व तेज कुसुमाग्रजांच्या कवितेत आहे' या विधानाची चर्चा करा. 15

*(c)* नामदेव ढसाळांच्या सामाजिक व राजकीय जीवनातील संघर्ष 'या सत्तेत जीव रमत नाही' मधून कसा चितारला आहे ते लिहा. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'मृद्‌गंध' या कवितासंग्रहातील प्रतिमांची विविधता व नाविन्य यांचे विवेचन करा. 15

*(b)* 'संध्याकाळच्या कविता' मधील अनुभवांचे स्वरुप स्पष्ट करुन त्या कविता दुर्बोध अर्थदृष्ट्या संदिग्ध का वाटतात ते लिहा. 15

*(c)* शाहिरी काव्य हे अस्सल मराठी काव्य आहे हे 'पैंजण' च्या आधारे पटवून द्या. 20

★★★

# मराठी (प्रश्न-पत्र–II)

( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

### उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

# MARATHI (PAPER—II)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

### Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* एक वेळ एके ब्राह्मणे भटोबासाते पूसीले: ''हा भटो तुमचि मुर्ति झळझळीत दिसत असेः तरि तुम्ही काइ त्रीकाळ स्नान करीता?'' तंवं भटोबासी म्हणीतलें: ''पंचवीस वरूषे भिक्षेसी जाली: परि तै लागौनि उष्णवणी आन सीतलवणी: आंगी लावीली नाही.'' तंवं तेणे म्हणीतलें: ''तरि हें कैसे भटो?'' भटोबासी म्हणीतलें: ''गगनी तारांगणें झळझळीत दिसति: ते काइ तयांचें मंदिर झळकताए: किं आतौल आहे तें झळकताए?'' भटोबासी म्हणीतलें: ''तैसे माझीया राजमंदिरामध्ये वस्तु आहे: ते क्रीडताए: म्हणौनि माझी मुर्ति झळझळिताए:''॥

*(b)* विश्वासला चार महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्यानं ती मुकाट्यानं ऐकली शिक्षेच्या अवधीत त्यानं इकडंतिकडं पाहिलं नाही. स्वतःसाठी कोणतीच सवलत मागितली नाही. शारीरिक कष्ट जणू तो स्वेच्छेनं करीत होता. त्यानं कसलीच कसूर केली नाही. भोवताली बघणं आणि विचार करणं एवढंच काम जणू तो करीत होता. त्यामुळं त्याची प्रकृती बरीच सुदृढ झाली. तो बाहेर आला तेव्हा शांत डोळ्यांनी बाहेरच्या जगाकडं बघू लागला. आपल्या घराशी आला तेव्हा त्याला जाणवलं की अरे! आपण आपल्या घरासमोर उभे आहोत!

*(c)* काम मातीचे व माती कामांची कारण शेवटी माणूसही मातीच व मातीच माणूस व माणसापेक्षा श्रेष्ठ. कारण मातीच जगवतेना साऱ्या प्राण्यांना, माणसांना. आपले सारे कष्ट उपसून व स्वतः झिजून म्हणूनच ती काळी माती व तिच्या धनावर पोसले जाणारे आम्ही सारे तिचेच धन आरंभापासून ते शेवटपर्यन्त.

*(d)* बाटे तुज मृगया। ही का?<br>
समजसि जग जणुं। जंगल सारें,<br>
आणिक स्त्रीजन। वन्य पशु कां?<br>
बघुनि मृगातें। कस्तुरी मिळते,<br>
लाभे तैशी। प्रीति कधीं का?

*(e)* मुलाचे हे कानाचे पडदे फाडणारे कराल क्रंदन ऐकून म्हातारा रडू लागला. थरथरू लागला. त्याच्याकडे दिनवाण्या नजरेने पाहू लागला; आणि बापाचे अश्रू आणि त्याच्या अंगाचा चाललेला कंप पाहून जयचंद खाली बसला. त्याची छाती चोळू लागला. डोळे पुसू लागला. आणि त्याच्या स्वच्छ सुकुमार बोटांतील प्रेम पाहून म्हाताऱ्याने त्याचे डोके ओढून आपल्या छातीवर ठेवले. ते तो गोंजारू लागला आणि गेल्या दोन-चार-पाच वर्षांपासून घरात असूनही मानसिक दृष्ट्या एकाकी झालेला जय पितृसुखाचे सुख घेत तसेच डोके ठेवून बसला. उन्हात जळणारे शेत जसे कोसळणारा पाऊस पिऊन सुगंधू लागते, फुलू लागते, तसा तोही स्नेहस्निग्ध होऊन सुगंधू लागला.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'स्मृतिस्थळ' या ग्रंथात यादवकालीन सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक जीवनसंदर्भ सहजभावाने साकारलेले दिसतात, साधार लिहा. 15

*(b)* 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात शेतकऱ्यांच्या स्थितिगतीचे जे चित्रण आढळते ते सार्वकालिक ठरणारे आहे, हे विधान सोदाहरण स्पष्ट करा. 15

*(c)* 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीतील आशयविषयाची सामाजिकतेच्या अंगाने चिकित्सा करा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'साष्टांग नमस्कार', हे एक प्रयोगशील-व्यावसायिक नाटक आहे, या विधानाची सोदाहरण चर्चा करा. 15

(b) 'बाबुराव बागुलांची कथा सामाजिक, आर्थिक या दोन्ही अंगांनी नाडलेल्यांचे भावविश्व साकारते' हे मत 'जेव्हा मी जात चोरली होती' मधील कथांच्या आधारे स्पष्ट करा. 15

(c) 'शिळान' कथासंग्रहातील स्त्रियांच्या अनेकस्तरीय जीवनसंघर्षाचे स्वरूप सोदाहरण विशद करा. 20

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीतील पात्रचित्रणाचे स्वरूप साधार लिहा. 15

(b) 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाची वैशिष्ट्ये उदाहरणे देऊन नमूद करा. 15

(c) ''लग्नसंस्थेची सर्वांगीण चिकित्सा 'एकेक पान गळावया' या संग्रहातील कथांमधून झालेली आढळते'', या मताची यथार्थता पटवा. 20

## SECTION—B

**5.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) हडबडलीं पातकें। घेता रामनाम एकें॥
नाम घेतां ततक्षणीं। चित्रगुप्तें सांडिली लेखणी॥
घेऊनि पूजेचा संभार। ब्रह्मा येतसे समोर॥
नामा म्हणे जरी हे लटकें। तरी छेदावें मस्तक॥

(b) ऐक राया तूं थोर दयासिंधू। नीतिसुंदर तूं, तूंचि दीनबंधू॥
निखंदूनी बोलिलों नको मंदूं। सकल-वंदनीय पाय तुझे वंदूं॥
पारधीमाजी खगा मृगाराजे। करिति हिंसा जे ते बरीच साजे॥
तुवां दिधली मज मोकळीकगाजे। दया केली हे कीर्ति तुझी गाजे॥
हंस मिळणेच कठीण महीलोकी। सोनयाचा तो नवल हें विलोकीं॥
तशा मजलाही सोडिलें तुवा की। तुझा ऐसा उपकार मी न झांकीं॥

(c) भिंत खचली, कलथून खांब गेला,
जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाला;
तिच्या कौलारीं बसुनि पारवा तो
खिन्न नीरस एकांतगीत गातो.

(d) प्रासाद भिडूं द्या गगनाला गर्वांत
डोलुं द्या पताका सत्तेच्या उन्मत्त
दौलती उठू द्या प्राशुनि दुर्बळ रक्त
कोसळेल इमला समूळ अेकारातीं
मातीवर चढणें अेक नवा थर अंती!

(e) या चवताळलेल्या भूकिस्तांच्या झुंडी
कुणीकडून आल्या कुठे निघाल्या?
या शहराच्या चौकाचौकात उभारलेले
क्रांतिकारकांचे पुतळे उखडून कुठे गेल्या?

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) नामदेवांच्या अभंगांतून वत्सल आणि करुण हे दोन्ही रस अभिव्यक्त झाले आहेत, कसे ते सोदाहरण लिहा. 15

(b) 'नारायण सुर्वे यांच्या कवितांमधून प्रकटलेले आशय-विचारविश्व वास्तवाभिमुख आहे' या विधानातील सत्यासत्यता 'जाहीरनामा'च्या आधारे स्पष्ट करा. 15

(c) 'शाहिरी काव्य महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे' हे विधान 'पैंजण'च्या आधारे पटवून द्या. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'रघुनाथ पंडिताची वर्णनशैली ही श्रेष्ठ दर्जाची होती', हे मत 'दमयंती स्वयंवर'च्या आधारे स्पष्ट करा. 15

(b) 'उदासिनता हा बालकवींच्या कवितांचा मुख्य स्वर आहे' या विधानाची यथार्थता पटवा. 15

(c) ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' मधील प्रतिभासृष्टीचे स्वरूप साधार उलगडून दाखवा. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'विशाखा' मध्ये सामाजिक व राजकीय जीवनजाणिवा कशा व्यक्त झाल्या आहेत ते सोदाहरण लिहा. 15

(b) नामदेव ढसाळांच्या कवितांमधून आविष्कृत झालेला अनुभव व्यामिश्र स्वरूपाचा आहे हे मत 'या सत्तेत जीव रमत नाही' मधील कवितांच्या आधारे स्पष्ट करा. 15

(c) 'मृद्गंध' या काव्यसंग्रहाच्या आधारे विंदा करंदीकरांच्या प्रतिभेची विविधता साधार विशद करा. 20

★★★

# मराठी (प्रश्न-पत्र–II)

( साहित्य )

| वेळ : तीन तास | कमाल अंक : 250 |
|---|---|

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

# MARATHI (PAPER—II)

( LITERATURE )

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250 |
|---|---|

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उत्ताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* याउपरि मागौतें कामाइसीं म्हणितलें: 'भटो रावो मरैलः आणि मातें आगीआंतु घालीतीलः' भटोबासीं म्हणितलें: 'तरि तुम्ही आपुला आदिभावो चुकवाः' 'मग ते बळाधिकारें घालीतीलः' 'तरि तुम्हा आत्महत्त्येचे नरक नाहीः' इतुलेनि ते उगींचि राहिलीः मग काही पदार्थ आणिला होताः तो भटोबासांसि संपादिलाः मग आज्ञा घेउनि गावां गेलीः ॥ मग कितीका दिसां रावो निवर्तलाः मग तेही लैसेचि केंलें: बहुतापरि आपुला आदिभावो चुकवीलाः परी येरी बळाधिकारूचि केलाः

*(b)* आता आमच्या नीतिमान धार्मिक सरकारने केवळ धर्मलोभ एकीकडे ठेऊन शेतकऱ्यांचे आचरणावर डोळा ठेवण्याकरिता डिटेक्टिव्ह डॉक्टरांच्या नेमणूका करून शेतकऱ्यांनी आपल्या गैरशिस्त आचरणावरूनी प्रकृति बिघडविल्यास व चोऱ्या छिनाल्या वगैरे नीच आचरण केल्यास त्यांस योग्य शिक्षा करण्याविषयी चांगला बंदोबस्त केल्याविना ते नीतिवान होणे नाहीत.

*(c)* ज्यांना कुठल्याही तऱ्हेची जवळीकच नको वाटते असेही काही असतीलच की जगात. आणिक जवळीक झाल्याखेरीज त्यांना कसं उमजणार की हे नको मला म्हणून? मनात आलं. एक क्रांती व्हायला हवी—सगळ्या या समाजमान्य पद्धती बदलणारी.

*(d)* ध्येय असलेली मंडळी अनेक शतकांनी होणारी गोष्ट करण्यास हात घालतात. त्यांच्या आयुष्यात तर काहीच होत नाही, आणि त्यांच्या बायकांमुलांना मात्र त्यांचे ध्येयवादित्त्वाचें फल भोगावे लागते.

*(e)* अरे तुम्ही सारे सरकारचे जावई! उगीच गपचीप जे दिले ते खाण्यापेक्षा किरकिर का करायचं? तुम्हाला सरकारनं सारं दिलंय आता फक्त पोरी देयाच्या राहिल्यात.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* नागदेवाचार्यांच्या ठिकाणी असणाऱ्या बुद्धी व भावना यांचे मनोज्ञ मिश्रण आणि त्यांच्या बुद्धिमत्तेची अनुभूती कशाप्रकारे येते? 'स्मृतिस्थळ' मधील विविध प्रसंगांच्या आधारे विशद करा. 15

*(b)* 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकाच्या लेखनामागील महात्मा जोतीराव फुले यांची विचारधारा स्पष्ट करा. 15

*(c)* सामाजिक भूमिकेतून कौटुंबिक भावनांचे विश्लेषण श्री. व्यं. केतकरांनी कशारीतीने केले आहे? 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीतील घटना-प्रसंगांच्याद्वारे उलगडून दाखवा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'साष्टांग नमस्कार' या नाटकातील विनोदांचे विशेष उदाहरणे देऊन विशद करा. 15

*(b)* 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथासंग्रहातील कथांमधून उद्याच्या सुंदर, निरामय आणि सशक्त जगाचे स्वप्न बाबुराव बागूल यांनी मांडलेले आहे; असे तुम्हास वाटते का? साधक-बाधक चर्चा करा. 15

*(c)* उद्धव शेळके यांच्या कथालेखनात अस्सल मानवतावादी जीवनदृष्टीची अनुभूती कशी येते, 'शिळान' या कथासंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा. 20

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीतील पात्रांच्या संवाद-विसंवादातून समग्र मानवी जीवनानुभूतीचे प्रत्ययकारी दर्शन कशाप्रकारे होते? सविस्तर लिहा. 15

*(b)* आधुनिक जीवनजाणिवेने उपस्थित केलेले पेच उलगडून पाहण्याचा प्रयत्न गौरी देशपांडे यांनी केला आहे; असे तुम्हास वाटते का? सोदाहरण स्पष्ट करा. 15

*(c)* मराठवाड्यातील बोलीचे कोणकोणते विशेष प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' मध्ये आढळतात, सोदाहरण स्पष्ट करा. 20

## SECTION—B

**5.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* श्रीमुख साजिरे कुंडले गोमटी। तेथ माझी दृष्टी बैसलीसे॥ १॥
कटीवर कर समचरण साजिरे। देखावया झुरे माझे मन॥ २॥
माहेरीची आस दसरा दिवाळी। बाहे ठेवी निढळी वाट पाहे॥ ३॥

*(b)* राजे असाल तरि धन्य वसुंधरा हे।
शोभाल देव, तरि नाक यथार्थ आहे॥
भोगी तुम्ही उपजलां जरि नागलोकीं।
खाले असोनि सकळांवरि होय तो कीं॥

*(c)* कष्टाची बरि भाजिभाकरी तूप साखरेचि चोरि नको।
आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढती पाहुं नको॥
दिली स्थिती देवानें तींनच मानी सुख कधिं विटू नको।
असल्या गांठी धनसंचय कर सत्कार्या व्यय हटू नको॥

*(d)* भर मार्गात कधी ऐकला तव मंजुळ गान
अडखळुनि थांबतो क्षणभर बेभान
शब्दाशब्दांच्या घटांतून ओसंडे भाव
पारिजातकाच्या फुलांचा कोमल वर्षाव !

*(e)* हा रस्ता अटळ आहे ! अटळ घाण सारी;
अटळ आहे शिसारी.
एक वेळ अशी येईल, घाणीचेच खत होईल
अन्यायाची सारीं शिते, उडतील पुन्हां;
होतील भुतें.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'आर्त मनाची उत्फुर्त भावकविता' म्हणून संत नामदेवांच्या अभंगवाणीचे परीक्षण तुमच्या शब्दांत लिहा. 15

*(b)* रघुनाथपंडितांच्या कल्पनाचातुर्याचा प्रत्यय 'दमयंती स्वयंवर' मध्ये कोणकोणत्या रीतीने येतो त्याचे उदाहरणांसहीत विवेचन करा. 15

*(c)* पैंजण मधील पोवाडे म्हणजे 'मराठयांचा काव्यमय इतिहास आहे' हे मत तुम्हास योग्य वाटते का? साधक-बाधक चर्चा करा. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* 'एक निसर्ग कवी' या नात्याने बालकवींच्या कवितांचा परामर्श घ्या. 15

*(b)* ग्रेस यांच्या संध्याकाळच्या कवितेमध्ये आढळणाऱ्या गूढ प्रतिमांचा अन्वयार्थ उलगडून दाखवा. 15

*(c)* 'प्रीती' आणि 'क्रांती' यांचा उद्घोष करणाऱ्या कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' मधील कवितांचा ऊहापोह करा. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* कामगारांच्या जीवनानुभवांची यथार्थ आणि कलात्मक संघर्ष चित्रे नारायण सुर्वे यांनी कवितेतून कोणत्याप्रकारे रेखाटलेली आहेत, ते 'जाहिरनामा' मधील कवितांच्या आधाराने सांगा. 15

*(b)* सूक्ष्मनिरीक्षण, बुद्धिवादी दृष्टिकोण आणि विचारांची प्रखरता ही विंदा करंदीकरांच्या कवितेची वैशिष्ट्ये 'मृदगंध' मध्ये कशी दिसतात ते विशद करा. 15

*(c)* 'या सत्तेत जीव रमत नाही' या कवितासंग्रहाच्या शीर्षकाची यथार्थता ढसाळ यांच्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा. 20

★★★

# मराठी (प्रश्न-पत्र–II)

( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

# MARATHI (PAPER—II)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

*(a)* परसरामबासीं धाकुटें आचारस्थळ आणि वीचारस्थळ करणें: केशोबासीं रत्नमाळास्तोत्र करीतां। चांदह सते नीवडिलीं होती: तथांतु आणिक कांहीं प्रश्ना (म) बासी नीवडुनी घातलीः मग प्रश्ना (म) बासी गोपाळ बासाचेनी संवादेंः अन्वयो लाउनी धाकुटें आचारस्थळ आणि वीचारस्थळें केलेंः

*(b)* ''स्वतःस मात्र सुख होण्याकरिता एकंदर सर्व मानवी प्राण्यास कायिक व मानसिक पिडा दिली नाही, म्हणजे त्यासच पुण्य म्हणावे.''

*(c)* माझा कोठलाही खिसा तुम्ही तपासून पहा! त्यात तुम्हाला वाळलेली गुलाबाची फुलं, जाईच्या सुकलेल्या वेण्या, चुरगळलेले हातरुमाल, बांगड्यांचे तुकडे आणि हिरव्या पोतीचे मणी-आणखीन किती तरी गोष्टी सापडतील! हे तर आमच्या काव्याचं सारं भांडवल आहे. कवीचे खिसे म्हणजे सुंदर स्त्रियांच्या हरवलेल्या जिनसा सापडण्याचे हमखास ठिकाण असे समजावे.

*(d)* आम्ही वस्तीतून बाहेर आल्यावर काशीनाथ मला म्हणाला, ''मास्तर, चला पोलीस स्टेशनवर''

''नको.''

''तुम्ही या मूर्खांचा मार सहन केला तरी कसा?''

''त्यांचा मार मी कुठे खाल्ला? मनूने मला मारलं! चल काशीनाथ....''

*(e)* पळून जावं वाटायचं. पण कसं जाऊ. आलतो तितून नको नको म्हणाले तेयनी तरी व इतं हेयच्या पेचात सापडलो होतो. कसा कुण्या तोंडानं पळून जाऊ वाटू लागल. असं करु तर कसं व्हईल तसं करु तसं कसं व्हईल. ईकडे आड तिकडे हीर. आगीतून उटून फोफाट्यात पडल्यावानी वाटू लागलं. पण वाटायचं की बाबा. जातील हे बी दिवस.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि भौगोलिक परिस्थितीचे चित्र स्मृतिस्थळातून कसे साकार झाले आहे ते सविस्तर वर्णन करा. 15

*(b)* 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातून अभिव्यक्त होणारी, मानवी जीवनासंबंधी महात्मा फुले यांची भूमिका स्पष्ट करा. 15

*(c)* नैतिक दृष्ट्या स्खलनशील स्त्री-पुरुष संबंधांचा विचार 'ब्राह्मणकन्या' कादंबरीत केतकरांनी कसा केला आहे, चर्चा करा. 20

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'साष्टांग नमस्कार' या नाटकात छांदिष्ट माणसांचे एक संपूर्ण विश्वच साकारले आहे. असे तुम्हाला वाटते का? साधक-बाधक चर्चा करा. 15

(b) 'जन हे वोळतू जेथे' या कादंबरीतील नायकाच्या संघर्षाचे स्वरूप स्पष्ट करा. 15

(c) " 'शिळान' संग्रहातून उद्धव शेळके यांच्या व्यापक अनुभवविश्वाचे प्रत्ययकारी दर्शन घडते" या विधानाचा परामर्श घ्या. 20

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) "बाबूराव बागूल हे दलित जीवनाचे सर्वश्रेष्ठ कथाकार आहेत." 'जेव्हा मी जात चोरली होती'च्या आधारे स्पष्ट करा. 15

(b) 'एकेक पान गळावया' या कादंबरीचा आकृतिबंध उलगडून दाखवा. 15

(c) "मराठवाड्यातील दलित जीवनातील दैन्य, दास्य आणि असह्य दुःख 'आठवणीचे पक्षी' मधून पाझरते" या विधानाची विस्तृत चर्चा करा. 20

## SECTION—B

**5.** पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) सुई आणि सातुळी कात्री गज दोरा। मांडिला पसारा सदाशिवी नामा म्हणें शिवीं विठोबाचे अंगी। त्याचेनि मी जगी धन्य झालो॥

(b) सुंदरा मनामधिं भरली जरा नाहि ठरली हवेलिंत शिरली मोत्याचा भांग
रे गड्या हौस नाहिं पुरलि म्हणोनी विरलि पुन्हा नाहिं फिरलि कुणाची सांग॥

(c) त्यातील एक कलहंस तटी निजेला
जो भागला जलविहार विशेष केला
पोटीच एक पद, लांबविला दुजा जो
पक्षी तनू लपवि, भूप तया पाहतो.

(d) परी भव्य तें तेज पाहून पूजून
घेऊं गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे.

(e) अनेक असले खेळ करुं प्रेमाशा विश्वांत भरुं,
सोडुनिया अपुले श्वास खेळवु नाचवु उल्हास
प्रभातकाळी नामनिराळी
होउनिया आपण राहू लोकांच्या मौजा पाहूं

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''नामदेवाच्या अंतरंगाचे अत्यंत स्वच्छ व नितळ प्रतिबिंब त्यांच्या अभंगवाणीत पाहावयास मिळते.'' या विधानाची सत्यता पटवून द्या. 15

(b) शाहिरी वाङ्मयाला 'मराठी काव्याची प्रभात' असे का म्हटले जाते ते स्पष्ट करा. 15

(c) रघुनाथ पंडितांच्या 'दमयंती स्वयंवर' या आख्यान काव्याची कलात्मक वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा. 20

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) बालकवींच्या कवितांमधून दिसून येणाऱ्या निसर्गाच्या विविध भावछटा उलगडून दाखवा. 15

(b) ''कुसुमाग्रजांच्या कवितेतून अपार जीवननिष्ठा सतत प्रवाहित होत असते.'' 'विशाखा' काव्यसंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा. 15

(c) 'मृद्‌गंध' या संग्रहातून करंदीकरांची सामाजिक जाणीव आणि इहवादी दृष्टिकोन ठाशीवपणे व्यक्त होतो. साधार पटवून द्या. 20

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'जाहीरनामा' या काव्यसंग्रहातून नारायण सुर्वे यांचा मानवतावादी दृष्टिकोन कसा अभिव्यक्त होतो? चर्चा करा. 15

(b) कवी ग्रेस यांच्या काव्याची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) 'या सत्तेत जीव रमत नाही' मधील कविता नामदेव ढसाळांच्या काव्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या कविता आहेत. साधार पटवून द्या. 20

★★★